नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४८ Issue - 48 | वार शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ Blow- Friday Date 4 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शुभमन गिलने रचला इतिहास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बर्मिंगहम: शुभमन गिलने दुसऱ्या कसोटीत सामन्यात द्विशतक झळकावले आणि इतिहास रचला आहे. जी गोष्ट गेल्या ९३ वर्षांच्या इतिहासात



कोणालाही जमली नाही ती गिलने यावेळी करुन दाखवली आहे.

शुभमन गिलने गेल्या सामन्यातही शतक झळकावलं होतं. पण पहिल्या सामन्यात त्याला दीड शतक झळकावण्याची संधी होती. पण गिल हा पहिल्या कसोटीत १४७ धावांवर बाद झाला होता. पण या सामन्यात मात्र गिलने ही कसर भरून काढली. कारण गिलने या सामन्यात दीड शतक झळकावले. आतापर्यंतच्या कसोटी कारकिर्दीत गिलला कधीही दीड शतक झळकावता आले नव्हते. त्यामुळे आतापर्यंतच्या आयुष्यात गिलने प्रथमच दिड शतक झळकावले. पण गिलने त्याचबरोबर ९३ वर्षांच्या इतिहास त्यानंतर मोडला आहे.

शुभमन गिलने या सामन्यात जे आतापर्यंत ९३ वर्षांत जे कोणालाही जमलं नाही ते करुन दाखवलं आहे. गिलने या सामन्यात फक्त शतक किंवा दीड शतक नाही तर त्याने द्विशतक झळकावले आहेत. भारतीय संघ १९३२ पासून इंग्लंडमध्ये कसोटी क्रिकेट खेळत आहे. पण गेल्या ९३ वर्षांच्या इतिहासात भारताच्या एकाही कर्णधाराला इंग्लंडमध्ये खेळताना द्विशतक झळकावता आले नव्हते. यापूर्वी मोहम्मद अझरने इंग्लंडमध्ये १९९० साली खेळत असताना १७९ धावा केल्या होत्या. तो रेकॉर्ड आता गिलने मोडीत काढला आहे आणि त्यामुळेच इंग्लंडमध्ये सर्वाधिक धावा करणारा तो भारताचा कर्णधार ठरला आहे. पण इंग्लंडमध्ये द्विशतक झळकावणारा मात्र तो पहिलाच भारताचा कर्णधार ठरलेला आहे.

## संतांच्या पालख्यांचा पंढरीत प्रवेश

### माउलीच्या पालखीचे नेत्रदीपक रिंगण आणि बंधुभेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढ शु. अष्टमीला तोंडले येथून सोहळा निघाल्यावर वाटेत सोपानकाकांच्या पालखीची व माउलींच्या पालखीची बंधु भेट माळशिरस तालुक्याच्या हद्दीत झाली . दुपारच्या भोजनानंतर टप्पा येथे माउलींचा पालखी सोहळा विसावतो . याच वेळेस सोपानकाकाकांचा पालखी सोहळा शेजारून पुढे जातो . सोपानकाकांचा रथ माउलींच्या रथा शेजारी आल्यावर थोडा वेळ थांबतो यावेळी दोन्ही संस्थानकडून परस्परांना नारळ प्रसाद दिला जातो. तत्पुर्वी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ठाकूर बुवा समाधी येथे नेत्रदीपक गोल रिंगण संपन्न झाले.

माउलीची पालखी वेळापूर येथून प्रस्थान झाल्यानंतर ठाकूर बुवा समाधी या ठिकाणी पालखी पोहचली. या ठिकाणी संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचा माउली माउली , टाळ मृदुंगच्या जयघोष करीत रिंगण सोहळा पार पडला रिंगण सोहळा पार पडल्यानंतर पालखी पुढे मार्गस्थ झाली. काही वेळातच माळशिरस तालुक्याच्या हद्दीत जेष्ठ बंधू सोपानदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीची भेट झाली.या दोन पालख्या एकमेकान भेटल्या. या वेळी उपस्थित भाविकांनी विठ्ठल विठ्ठलचा जयघोष केला. माउलीच्या पालखी विश्वस्तांनी सोपानदेव यांच्या मानकरी याना मानाचा नारळ प्रसाद दिला. बंधू भेटीचा भावपूर्ण सोहळा पाहून भाविक सुखावले. पुढे माउलीची पालखी भंडीशेगाव येथे मुक्कमी पोहचली.




जगद्गुरू संत तुकारम महाराज यांच्या पालखीने बोरगाव पालखी मार्गस्थ होत तोंडले बोंडले या ठिकाणी पोहचली. या ठिकाणी पालखीतील सर्व भाविक धावले. तुका म्हणे धावा ... आहे पंढरीस विसावा या अभंगाप्रमाणे भाविकांनी धावा केला. आणि पालखी पिराची कुरोली येथे मुक्कमी पोहोचली.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, पंढपूर तालुक्यात आगमण झाले. या पालख्यांचे पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी स्वागत केले.

## पोलिस स्टेशनमध्ये स्वतंत्र अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट स्थापन : मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : युवकांमधील अंमली पदार्थांच्या व्यवसनाधिनतेला रोखण्यासाठर पोलिस स्टेशनमध्ये स्वतंत्र अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. अमली पदार्थ आढळल्यास टेस्टिंगपासून पुढील कायदेशीर कारवाईपर्यंतची यंत्रणा उभी करण्यात आली आहे. पोलीसांकडून शाळा-कॉलेज परिसरात विशेष लक्ष देण्यात येत असून मुंबईत २००० हून अधिक पानटपऱ्यांवर कारवाई करत त्यांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेतील लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितले

अंमली पदार्थासंदर्भात विधानपरिषद सदस्य भाई जगताप यांनी नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षेवधीत विरोधी पक्षेनेते अंबादास दानवे, सदस्य शिवाजीराव गर्जे, संजय केनेकर, सतेज पाटील आणि संजय खोडके यांनीही उपप्रश्न विचारले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण आखण्यात आले असून, त्याविरोधातली लढाई आता अधिक आक्रमक आणि सर्वसमावेशक झाली आहे. यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या सहभागाच्या प्रकरणांवर शासनाने कठोर भूमिका घेतली असून आता सेवेतून निलंबनाऐवजी थेट बडतर्फ करण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या कारवाईत दोन इंडोनेशियन नागरिकांकडून २१ कोटी रुपयांचा हायड्रो गांजा जप्त करण्यात आला. त्याचबरोबर, वसई परिसरात बंद पडलेल्या केमिकल कारखान्यांतून सिंथेटिक ड्रग्जची निर्मिती होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा ठिकाणी कारवाई करण्यात आली नाही.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सोशल मीडियावरून ड्रग्ज विक्रीवर सायबर पोलिसांची नजर असून येथून ड्रग्जची विक्री सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सायबर विभागाने १५ मार्केटप्लेस निष्प्रभ केले. संबंधित गुन्हेगारांवर कारवाई झाली आहे. त्याचबरोबर २५० कोटींच्या एमडी ड्रग



प्रकरणात इंटरपोलच्या माध्यमातून परदेशातील आरोपींना अटक केली आहे. या लढ्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर समन्वयाने काम सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

एनडीपीएस कायद्याच्या बरोबरीने 'मकोका' अंतर्गतही कारवाई करता यावी, यासाठी विधिमंडळात सुधारणा सादर केली जात आहे. यामुळे वारंवार गुन्हे करणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल. त्याचबरोबर, परदेशातून गुजरात व जेएनपीटी पोर्टमार्गे येणाऱ्या मालाच्या तपासणीसाठी स्कॅनरची यंत्रणा उभी केली असून, यादृच्छिक तपासणीही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

अमली पदार्थविरोधी मोहीम ही केवळ पोलीस किंवा गृहमंत्रालयाचा विषय नाही, तर 'व्होल ऑफ गव्हर्नमेंट' अप्रोचची याला गरज आहे, असं सांगत मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधित विभागांना सहकार्याचे आवाहन केले. त्याचबरोबर, ओटीटी प्लॅटफॉर्मवर अमली पदार्थांचे उदात्तीकरण थांबवायला हवे. यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यामार्फत ओटीटी प्लॅटफॉर्मशी किंवा अशा प्रकारच्या वेब सिरीज दाखविण्याऱ्या चॅनेल्सशी सपर्क साधून जाणिव जागृतीच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## राज्यातील धरणांमधील आवक वाढली, रायगडातील १७ धरणे फुल्ल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे . धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीच्या पूर परिस्थितीत वाढ झाली आहे . गंगापूर धरणातून दुपारी बारा वाजता ३७१६ वेगाने पाण्याचा विसर्ग गोदावरीत सुरू झालाय . नाशिकमध्ये रामकुंड परिसरातील छोटे मोठे मंदिर पुन्हा पाण्याखाली गेले आहेत . दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पुराचे पाणी लागले आहे . दुसरीकडे आषाढी एकादशीच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांमुळे उजनी धरणात होणारा पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आलाय . राज्यात बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे .काही धरणांमधून विसर्ग सुरू झालाय .नदीच्या पाणीसाठ्यातही वाढ झाली आहे .



राज्यातील बहुतांश मोठ्या धरण प्रकल्पांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक जलसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली . पुण्यात गेल्या वर्षी १५ टक्क्यांवर असलेला उपयुक्त जलसाठा यंदा ५८.२१ टक्क्यांवर आहे . नाशिकच्या ही बहुतांश धरण क्षेत्रांमध्ये चांगला पाऊस झाल्याने गेल्यावर्षी १७ टक्क्यांवर असलेला पाणीसाठा यंदा ५२.५४ टक्क्यांवर आहे . मराठवाड्यातील ही बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढत आहे .

**रायगड जिल्ह्यातील १७ धरणं फुल्ल !**

रायगड जिल्ह्यात रात्री मुसळधार पावसाने अलिबाग मुरुड रोहा नागोठणे परिसराला झोडपून काढले .त्यामुळे धरणांच्या पातळीत कमालीची वाढ झाली आहे .जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १७ धरण १०० टक्के भरली असून रायगड जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारे उन्नई धरण क्षमतेपेक्षा अधिक भरले आहे . धरणातून होणाऱ्या विसर्ग मुळे कुंडलिका नदी पातळीत मोठी वाढ झाली असून पाणी नदीपात्राच्या इशारा पातळीपर्यंत पोहचले आहे .सध्या नदीची पाणीपातळी २३.१० मीटरवर पोहोचलीये .त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय .खबरदारीचा उपाय म्हणून कुंडलिका नदीवरील जुना पूल रहदारीसाठी बंद करण्यात आला आहे .

**खडकवासला धरणातून विसर्ग वाढवला**

पुणे घाटमाथासह शहरात तसेच धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने खडकवासला धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे .रात्रभर झालेल्या पावसामुळे रात्री बारापासून ६४५१ क्युसेक विसर्ग करण्यात आलाय .पावसाच्या प्रमाणानुसार हा विसर्ग कमी जास्त केला जाणार असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली .

**उजनीतून पाण्याचा विसर्ग बंद**

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना चंद्रभागेच्या पाण्यात सुरक्षित पवित्र स्नान करता यावे यासाठी उजनी धरणातून गेल्या काही दिवसांपासून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग आज पूर्णपणे थांबविण्यात आला आहे . गेल्या पंधरा दिवसांपासून उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत होता .त्यामुळे चंद्रभागेची पाणी पातळी सातत्याने कमी अधिक होत होती .आता आषाढी सोहळ्याला केवळ तीन दिवस उरल्याने आजपासून उजनी धरणातला विसर्ग पूर्णपणे थांबवलाय .त्यामुळे सध्या पात्राच्या बाहेर आलेली चंद्रभागा उद्या पुन्हा पात्रात जाणार आहे . सध्या उजनी धरणात १०२ टीएमसी एवढा पाणीसाठा शिल्लक आहे .धरणात जवळपास १२,००० क्युसेक विसर्गने पाणी जमा होत आहे .

**गोसेखुर्द धरणातून २५ हजार क्युसेक विसर्ग**

भंडाऱ्यात गोसेखुर्द धरणाचे पाच दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून १५००० क्युसिक पाण्याचा विसर्ग वैनगंगा नदीपात्रात सुरू आहे .धरणाचे पाच दरवाजे आणि दोन्ही जलविद्युत प्रकल्पातून हा पाण्याचा विसर्ग होतोय .मागील चार दिवसात गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली .परिणामी धरणाचा जलसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी धरण प्रशासनानं आज सकाळी ११:०० वाजल्यापासून हा विसर्ग सुरू केला .नदीपात्रातून आवागमन करणाऱ्यांनी स्वतःची काळजी घ्यावी असा आवाहन गोसेखुर्द धरण प्रशासनाने केला आहे .दुपारी २ वाजता गोसेखुर्द धरणाचे आणखी चार दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे .आता एकूण नऊ दरवाजातून ४०,८९८ क्युसिक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे .

**कोयना धरणातून विसर्ग वाढणार**

उत्तर महाराष्ट्रातही गेल्या काही दिवसांपासून पावसाची हजेरी कायम असल्याने कोयना धरणातून विसर्ग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आलाय .धरणात ५६ टीएमसी पाणीसाठा आहे .महाबळेश्वरच्या पावसानेही दीड हजार मिलिमीटरचा टप्पा ओलांडला . बहुतांश मोठे प्रकल्प ५० ते ७५% पर्यंत भरले आहेत .त्यामुळे धरणातून विसर्ग वाढविण्यात येणार आहे . कोयना धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे आज सकाळच्या सुमारास धरणात २८ हजार क्यूसेक वेगाने पाणी येत होते .गेल्या २४ तासात कोयना धरणात अडीच टीएमसी पाणीसाठा वाढलाय.

**चौफाळा ते मंदिर उपमुख्यमंत्री गेले चालत**

**मंत्री आबिटकर, महाजन यांचीही उपस्थिती**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले. आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे, त्यांना कोणताही अडथळा येऊ नये यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुखदर्शन घेतले

यावेळी त्यांच्या समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले.



यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धनाचे काम सुरू असून, झालेल्या कामांची पाहणी केली तसेच मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन कामाबाबतची माहिती यावेळी दिली.

तसेच यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचा सत्कारही मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केला.

यावेळी आमदार समाधान आवताडे, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते

चौफळा ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व मंदिर परिसर वाहन प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या अनुषंगाने मंत्री महोदय तसेच राज शिष्टाचार नुसार अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मंदिर समिती मार्फत वाहनांची उपलब्धता करण्यात आली आहे. परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिर व मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणात असणारी गर्दी लक्षात घेता. भाविकांना कोणताही वाहतुकीचा त्रास अथवा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी चौफाळा ते मंदिर पर्यंत दर्शनासाठी चालत गेले.

## संपादकीय....

# झिरो टॉलरन्स धोरण

राज्यात अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण आखण्यात आले असून, त्याविरोधातली लढाई आता अधिक आक्रमक आणि सर्वसमावेशक झाली आहे. यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या सहभागाच्या प्रकरणांवर शासनाने कठोर भूमिका घेतली असून आता सेवेतून निलंबनाऐवजी थेट बडतर्फ करण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या कारवाईत दोन इंडोनेशियन नागरिकांकडून २१ कोटी रुपयांचा हायड्रो गांजा जप्त करण्यात आला. त्याचबरोबर, वसई परिसरात बंद पडलेल्या केमिकल कारखान्यांतून सिंथेटिक ड्रग्जची निर्मिती होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा ठिकाणी कारवाई करण्यात आली नाही. युवकांमधील अंमली पदार्थांच्या व्यवसनाधिनतेला रोखण्यासाठर पोलिस स्टेशनमध्ये स्वतंत्र अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. अमली पदार्थ आढळल्यास टेस्टिंगपासून पुढील कायदेशीर कारवाईपर्यंतची यंत्रणा उभी करण्यात आली आहे. पोलीसांकडून शाळा-कॉलेज परिसरात विशेष लक्ष देण्यात येत असून मुंबईत २००० हून अधिक पानटपऱ्यांवर कारवाई करत त्यांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे. सोशल मीडियावरून ड्रग्ज विक्रीवर सायबर पोलिसांची नजर असून येथून ड्रग्जची विक्री सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सायबर विभागाने १५ मार्केटप्लेस निष्प्रभ केले. संबंधित गुन्हेगारांवर कारवाई झाली आहे. त्याचबरोबर २५० कोटींच्या एमडी ड्रग प्रकरणात इंटरपोलच्या माध्यमातून परदेशातील आरोपींना अटक केली आहे. या लढ्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर समन्वयाने काम सुरू आहे.

# बोधगया येथील महाबोधी महाविहार तातडीने बौद्ध समाजाच्या ताब्यात यावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय घनघाव मुंबई : बौद्ध धर्माचा मूळ आधार असलेल्या या स्थळाचे व्यवस्थापन धर्मनिरपेक्ष व पारदर्शक पद्धतीने, आणि बौद्ध धर्मगुरूंच्या मार्गदर्शनाखाली होणे आवश्यक आहे.

बिहार मधील महाबोधी महाविहार हे जागतिक वारसा स्थळ असून, बौद्ध धर्मीयांचे श्रद्धास्थान आहे. या पवित्र स्थळी बौद्ध भिक्खूंना आणि बौद्ध समाजाला व्यवस्थापनात सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार मिळावा, यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांना निवेदन सादर करण्यात आले.

# मराठी माणूसः पराभूत विचार राजकारण कारणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जगभर तर्काच्या विचारा अभिवृत्तेतून मानव जातीचा निरंतर विकास झालेला आहे.हे सूत्रही मराठी माणूस प्रमाण मानत नाही. त्याला लज्ञानाला प्रमाण मानणे आणि प्रमेयावर विश्वास न ठेवणे इथल्या उच्चवर्णीय अध्यात्मिक वर्गाने आणि प्रबोधनकर्त्यांनी तयार केलेली जातीय निष्क्रिय वादाची प्रमेय ही मोठी वाटतात. हीच समस्या हळक्ष मराठी विचार विश्वातला फार मोठा सतत घडवलेला मोठा विचार घातपात आहे. इथल्या विचारांना आध्यात्मिक लोकशाहीचे स्वतः मोठे होण्यासाठी कथन करण्याचे व्यसन लागले आहे.

शास्त्रीय विचार पद्धती, तर्क पद्धती, ज्ञानातील राजकारण शोधण्याची अभिवृत्ति ही समाजातील प्रत्येक घटकात निर्माण झाली पाहिजे संस्कृती समाज यातला भेद कळाला पाहिजे. इथला वंशवाद हा फाशी वाद आहे. इथला सवर्ण वाद हाही फाशीवादाचेच रूप आहे. ते वर्तन तसे असते. इथला क्षेत्रीय सरंजाम हा ही फाशीवादाचेच राजेशाही आजचे वर्तमान कालीन रूप असते. तसा सवर्ण व क्षेत्रीय वर्गाचा सर्व प्रकारचा भारतीय विकसित फासिवाद आवृत्ती आहे असे म्हटले तर त्यात चूक ठरणार नाही.

फॅसीझम आणि हुकूमशाही हा नेहमी प्रत्येक काळात बदलते. वेग वेगळे स्वरप घेऊन ते पुढे येत असतात. तो फासिवाद समाजात महाराष्ट्र मध्ये चांगलाच रुजलेला आहे. हे राज्यातच नव्हे तर संपूर्ण भारतात भारतीय फासीवादाची एका दशकात आता पाळमुळे खोल वररुजू लागली आहेत.

मुळात फाशी वाद याची उत्पत्ती इटलीमध्ये फासी या शस्त्रांचा गट्ठा बाळगणारे ते लोक यातून निर्माण झालेला फॅसिझम हा भारतातल्या परशुराम वंशज यांनि स्वी कारलेलाआहे आजचे हे वर्तमान आहे. भारतातल्या परशुराम अर्थातच राष्ट्रीय स्वयं सेवक संघ परिवाराने इटली स्थित फाशी वाद अविस्कृतपणे स्वीकारला आहे. मुळात इथे असलेली चातुरवर्णी व्यवस्था, क्षेत्रीय राजेशही सरंजामी व्यवस्था आणि बनिया भांडवलदारी अर्थातच कार्पोरेट साम्राज्यवादी या सर्वांनी एकत्रित कंपनी प्रायोजित चालवलेल सरकार हा भारतातील फासिझम हा हजार हाताच्या ऑक्टोपस असून तो ज्या स्वरूपामध्ये सध्या रुजलेला आहे. तो समजावून घेणे खूप महत्वाचे आहे. इथे प्रशासन कार्पोरेट साम्राज्यवाद्यांनी चालवलेल्या भ्रष्टाचाराला आव्हान द्यायचे नाही. देशाची उघड उघड सर्वसाधण संपत्तीची चाललेली विक्री ही मूकपणे पहावयाची, साहित्यिक, विचारवंत, पत्रकार, लेखक, कलावंत यांनी आवाज उठवला तर ते आम्ही मानत असलेल्या पुण्य भूमीच्या विरोधातील आहेत ते प्रत्येक देश विरोधी कारवाया करतात. म्हणून ते देश द्रोही आहेत म्हणून त्यांना अतिरेकी राष्ट्रद्रोही ठरवून निरंतर आम्ही त्यांना तुरुंगात ठेवू. असा रुजवलेला भारतातील फॅसिझम हा भिन्न भिन्न स्वरूपामध्ये सर्वत्र दिसून येतो. अनिर्बंध अधिकार गाजवणारी प्रशासकीय यंत्रणा नोकरशाही सूचनांच्या नुसार न्यायदान करणारी न्यायपालिका, संघरक्षणाय खलनिग्रणाय अशा सूचनेने वर्तन करणारे पोलीस यंत्रणा, खोटे आणि उदात्तीकरण करणारी सर्व प्रकारची प्रसार माध्यमे, वंशवादाच्या भावनेने पछाडून आपण कॉर्पोरेट साम्राज्यवाद्यांच्या लुटीच्या कालखंडात सरकार टिकले पाहिजे. म्हणून सर्व प्रकारची मदत करीत सरकारच्या चुकांच समर्थन करणारी प्रसार माध्यमे, हे महाराष्ट्रातील विचार विश्वाचे पराभूत होत चालले गेल्या दशकातील फाशीवाद रुजलेले आजचे कटू वास्तव आहे.

महाराष्ट्रात फॅसिझम माध्यमातून पोलिसाच्या मार्फत, तुरुंगाच्या भीतीतून साहित्यिक पत्रकारांच्या राष्ट्रद्रोही खोट्या गुन्ह्याच्या रूपाने पुढे जातो आहे. महाराष्ट्रातील फॅसिझम हा एक जात दुसऱ्याचा शत्रू उभी करून एकमेकांत त्यांना लढवणे. या स्वरूपात सध्या अवतीर्ण असलेला दिसून येतो आहे महाराष्ट्रातील सर्व प्रसार यंत्रणात शीर्षस्थानी असलेले लोक हे या फॅसीझमचे वाटेकरी आहेत. अदृश्य भीती ने असंख्य जनसमूह ग्रासलेले आहेत. या देशातील सर्व अल्पसंख्यांक भिन्नधर्मीय हे आजचे वर्तमान अत्याचार वाट्याला आणून देणारे नाही ना? भविष्य जसे असेल तसे असेल असे समजून इथला प्रत्येक भिन्नधर्मीय माणूस वर्तन करतो आहे मराठी माणसाला या सगळ्या हजार ऑक्टोपससे दर्शन होत नाही. कारण महाराष्ट्र व भारतात रुजलेला फासी वाद हा असंख्य स्वरूपात रूप बदलून रुजत चाललेला आहे. याचे. मुख्य कारण सार्वत्रिक व वैयक्तिक हे प्रश्न विचारायचे असतात. शिक्षणातून प्रश्न विचारण्याची शक्ती विकसित न झाल्यामुळे इथे प्रश्नच उपस्थित होत नाहीत. शिक्षणातून विचार करणारा युवा वर्ग तयार होऊ नये.याचे धूर्त दीर्घ राजकारण पुण्यभूमीवादी यांनी शंभर वर्षांमध्ये साहित्य संस्कृती अध्यात्म या क्षेत्रातून चालविले होते ते आता रुजलेलआहे. असे हे आतून महाराष्ट्रातील साहित्य, संस्कृती,अध्यात्म हे फासिवाद रुजवणारे घटक ठरले आहेत. निरंतर यांनी माणसाला प्रश्न विहीन निष्क्रिय बनविले आहे. निवृत्तवादी, परलोकवादी, पाप-पुण्यवादी आणि चातुरवर्ण अंतिम आहे. हेच सांस्कृतिक मराठी भाषेचे संचित आहे. अशी अप्रत्यक्ष प्रत्यक्ष शिकवणूक या क्षेत्रातील सर्व मराठी बांधवांनी बांधवांना दिली गेली आहे.

एकूणच मराठी माणसाचे वाढते विचार दारिद्र्य हे अध्यात्माची श्रीमंती वाढवत आहे.मराठी माणसाचे विचार दारिद्र्य हे आपले भाषेचे पराभूत वर्तमान आहे. मराठी भाषा कथनाची, सृजनाची, वांग्मयीन प्रकाराची कलावादाची एवढ्या पुरतीच ती सीमित आहे. असा सार्वत्रिक भाषिकांच्या मध्ये भ्रम निर्माण करणारे बोरू हे फसिझमला बळकट करीत गेली शंभर वर्षे चालले आहेत. इथले सगळे प्रबोधन अध्यात्माच्या काठावरून चालते. इथे वैज्ञानिक दृष्टिकोन हा प्रबोधनाचा मुख्य हेतू बनत नाही. इथले प्रबोधन विचार संकल्पना, विचारधारा विचार विश्लेषण, विचार पद्धती, विचार राजकारण हे ज्ञानाचे विषय बनवत नाही. त्यामुळे मराठी माणसाचा आक्रोश आणि गर्दी इतपत वर्तनाचा सर्व प्रयत्न असतो. तो तसाच सर्व कालखंडात पुढे चालत आलेला आहे.

मराठी माणसाची शिक्षण हे लाभाच्या जवळ थांबले आहे. मराठी माणसाचे शिक्षण हे भौतिक वाद अध्यात्मिक वाद हाच अंतिम मानते आहे. शिक्षणातून विचाराचा ज्ञान निर्माण करणारा नवा माणूस निरंतर घडवण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ दिले जात नाहीत. माणूस विचार परावर्त, होत आहे. तो प्रश्न न करणारा, तो चिकित्सा न करणारा असला पाहिजे यासाठीच शिक्षणाची खाजगीकरण, हिंदीचे सक्ती चे धोरण लादले जाते आहे. संस्कृतीच्या सपाटीकारणांमध्ये हे सगळे घटक येतात . संस्कृतीचे सपाटीकरण ही अध्यात्माची दीर्घ शतकानून शतके चालणारी अज्ञात वाट असते. इथे प्रश्न नसतात. इथे डोळे मिटून मुक्तीचा मार्ग शोधणे चालू असते. अत्याचार अन्याय शोषण निर्मम हत्या जरी वाट्याला आली तरी हे पूर्व संचित आहे. असा मानणारा अध्यात्मिक लोकशाहीचा अनुयायार्थ इथल्या विचारांनी साहित्यिकांनी रुजवण्यात पुरुषार्थ गाजवलेला ते त्यांना ज्ञान वाटते. तो विचार वाटतो. तो भविष्याचा शोध वाटतो. इतका मराठी माणसाच्या विचाराचा थिटा व्यवहार आज सभोवताली चाललेला दिसून येतो.

त्यामुळे मराठी माणसाची दखल विचार विश्वात क्वचितच घेतली जाते. आपसात संघर्ष, एकमेकांचा द्वेष आणि संस्थात्मक गलिच्छ राजकारण करीत एकमेकांचे चालवलेले व्यापक स्तरावरील शोषण आणि राष्ट्रीय प्रवाहातील दोष समजून घेतले जात नाही आंतरराष्ट्रीय ज्ञानाच्या औद्योगिक क्रांतीच्या व्यवहारात कोणती गतिमानता आले आहे याची दखल घेण्याची वृत्ती नाही जग आभासी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सायबर क्राईमकडे पूर्णतः रूपांतरित होणार आहे हेही समजून घेण्याचे भारतीयांना महत्त्वाचे वाटत नाही औद्योगिक क्रांती भांडवलशाहीचा अतिरेकी शोषण वाद यातून यातून अतिरेकी शस्त्र विक्रीचा टोकाचा विचार सतत सर्वत्र वाढवत जाणे आणि त्यातून कोणत्याही चाललेल्या राज्यव्यवस्था व्यर्थ ठरवणे आणि हिंसेच्या युद्धाच्या जाहीर जगातील अनेक राष्ट्रांना कायम गुंतवून ठेवणे हे चाललेले व्यापक जागतिक साम्राज्यवाद्यांची फाशी वादीवर्तन हे देशी फाशीवादाच्या मदतीचा परिणाम आहे.

आता साम्राज्यवाद्यांचे जाळे हीच फाशीवादाचे नित्य वास्तव असून सुद्धा मराठी माणसाला हे कळेल तर तो फॅंसीझम विरुद्ध संघर्ष करण्यास सिद्ध होईल अनेक पावलांनी येत असलेला.फॅंसीझम हा समजून घेणे हे मराठी माणसाच्या विचार विश्वाचे केंद्रबिंदू कधी बनणार हाच एक मोठा प्रश्न आहे असे छोटे मोठे प्रश्न ही विचाराचीच अभिवृत्ति असते उत्तरांकडे निरंतर जात राहणे हे समूहाचे वर्तन बनवणे आवश्यक आहे हे शिक्षणाशिवाय अशक्य शिक्षण संपवणे त्यासाठी शिक्षणाचा मूलभूत अधिकार नव शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतून हळूहळू नष्ट करणे, शिक्षणाचे भगव्याकरण करणे खाजगीकरण करणे. मराठी भाषेचे प्रभुत्व संपवणे. त्यासाठी मराठी माणसाचे विचार अभिवर्तीचे वर्तन शिक्षणातूनच नष्ट करणे आणि भावना प्रतिक्रिया,असंतोष अशा प्रकारच्या वर्तन करणारा मराठी माणूस घडवण्यासाठी मराठी कारण विकसित होऊन देणे सर्वांचे व मराठीचे विचार राज् कारण दडपणे त्यासाठी सर्व देश भर शिक्षण संपविणे यातून विचार करण्याची वृत्ती संपवण्यासाठी लादलेली अनेक धोरने हे अनेकांपैकी एक फासिवादाचे आजचे स्वरूप आहे.

**– शिवाजी राऊत, सातारा**

# विचारांनी मारलेले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयघोष करावा तर करावा कुणाचा आणि अझेंडा सुद्धा घ्यावा तर घ्यावा कुणाचा, आणि आजच्या युगात जगावे तर जगावे कसे?

.... आजच्या स्वातंत्र्य काळात माणूस सोयी सुविधाँनी बऱ्यापैकी परिपूर्ण झाला. सर्व सुख सोयी माणसाला जवळपास मुबलक प्रमाणात मिळत गेल्या. सर्व यशोआराम पा्याजवळ लोळण घेऊ लागले तर ह्या सर्व गोष्टींच्या मागे एकच कारण आहे ते म्हणजे बलिदान. आता हे बलिदान कसे मिळाले ह्याचा आपण थोडा आढावा घेतला अन आपण इतिहासात मागे वळून बघितलं तर कळेल की अनेक क्रांतिकारकांनी देशहितासाठी दिलेलं आपल्या प्राणाची रक्ताची,त्यागाची आहुती कुणी आंदोलनामधून तर कुणी उठवामधून, तर कुणी ज्ञानाच्या मार्गातून अखंडपणे परकीयांच्या पारतंत्र्यातून ह्या देशाला सुरक्षित आणि गुलामीतून मुक्त करण्याचं कार्य केलं. त्यात बुद्ध, सम्राट अशोक,छत्रपती शिवाजी राजे, तुकोबाराय,बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्री बाई, फातिमा शेख, , गाडगे महाराज, भगत सिंग,अशा असंख्य क्रांतिकारकांची देशहितासाठी ज्वलंत मानवतावादी चळवळ ह्या देशाला मानसिक, परकीय, विषमतेच्या जाचातून मुक्त करण्यासाठी प्रेरणादायी ठरली. ह्या सर्व क्रांतिकारकांचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट लक्षात येईल की,

ही सर्व महान वीभूती माणसे एवढी प्रतिभावंत होती की जर त्यांनी देशहिताचा विचार सोडून वयक्तिक आयुष्याकडे लक्ष दिले असते तर खूप एशोराम भोगून,. सुखी जीवन जगले असते. पाहिजे ते मिळवलं असतं. सर्व सुख सोयी उपभोगल्या असत्या पण त्यांनी तसं केलं नाही. त्यांच्या विचारांमध्ये असलेली अन्यायाची चीड, आणि राष्ट्रीय सर्वसमावेशक तेची अन सामानतेची भावना त्यांना महान संबोधून जाते.ह्या सर्व गोष्टीचा मागील इतिहासाचा आढावा घेतल्यानंतर आपण जागतिक पातळीवर जर विचार केला तर महान क्रांतिकारकांची सर्वात जास्त संख्या ही भारत भू वर च पाहायला मिळेल. भौगोलिक दृष्ट्या भारत भूमी ही आशिया खंडातील सांस्कृतिक, कला, क्रांती लढा, ह्या सर्व पराक्रम, आणि कौशल्यातून घडलेली भूमी आहे.

ह्या सर्व भौगोलिक, ऐतिहासिक, प्रकरणं जहाल क्रांतिवीरांची कारकीर्द तपासून पहिल्यानंतर आपल्याला अंदाज येईल की,

भारताची आजची स्थिती- परिस्थिती त्यामानाने कशी असायला हवी हा विचार जागृत तरुणांना नक्कीच पडतो. क्रांतिकारकांच्या बलिदानाने भारताला स्वतंत्र्य मिळालं खरं पण ते स्वातंत्र्य खऱ्याअर्थाने कोण उपभोगत आहे तर माझ्या मते इथे असलेले रक्तापिपासू धर्मांधवादी, लबाड राजकारण करणारे राजकारणी, कामगारांचे श्रमावर आपला थाट गोळा करणारे उच्च वर्णीय, आणि ह्या सर्वांची हुजरेगिरी करणारी लबाड राज्यकर्त्यांच्या मार्जितील प्रशासन व्यवस्था.. ह्या सर्वाना वेगळं केलं तर शेवटला उरतोय तो म्हणजे जाती पाती मध्ये विभागलेला धर्म जाती पंथ समूह वर्ग.हा सर्व कारभार चालत असतांना आजची देशाची परिस्थिती, धर्माच्या, जातीच्या भेदाभेदीच्या नावाने किंव्हा विषमतेच्या, धार्मिक द्वेष्याच्या मार्गाने आपण का वाटचाल करत आहोत ?आणि विषमतावादी विचाराने गुरफटलेल्या मार्गातून वर्षानुवर्षे का अडकलो आहोत? ह्या सर्व गोष्टीचा प्रभाव देशातील गरीब जनतेवर आणि त्याच्या मूलभूत हक्कावर कसा गदा आणतो? ह्याचा कधी विचार केला आहे का? मी म्हणेन अजिबात नाही!.

आपण काही तिळमात्र बुद्धिवादी लोकं सोडली तर बाकीच्यांना ह्या तर्क वादी विचारांचा मागमूस सुद्धा लागलेला नाही. अनेक सुशिक्षित तरुणां आजच्या घडीला ह्या सर्व सामाजिक-राजकीय सत्यतेला पडताळून पाहण्याचं शक्यतो टाळतात. त्यांना ह्या विषयात जास्त काही रस वाटत नाही.

दुसरीकडे खेड्यापाड्यांचे मूलभूत स्वातंत्र्याची काही उदाहरणे पहिली तर आज सुद्धा स्वातंत्र्याच्या सत्तर पंचाहत्तर वर्षानंतर सुद्धा बरेचशे तरुण तरुणी रोजगार, शिक्षण, जनजागृती ह्या मूलभूत हक्कां पासून वंचित आहेत. म्हणजेच देश नाममात्र स्वातंत्र्य झाला आहे. पण अजून सुद्धा तो गुलामीच उपभोगतो आहे. परकी्यांपासून त्याची मुक्ती झाल्यानंतर आज तो सापडला आहे तो देशातल्या सो कोल्ड सोसायटी तल्या धनदांडगे, स्वार्थी राजकारणी, धर्मांधवादी प्रबल्यता जपणाऱ्या मानसिक गुलामीच्या जोखंडात. पण ह्या मानसिक गुलामितून मुक्त होण्यासाठी ह्या देशाला क्रांतिकारकांच्या संघर्षवादी विचारांचा सुद्धा वारसा आहे हे मात्र विसरून चालणार नाही.

आज देशाची वाटचाल पाहिली तर स्वार्थी राजकारणाच्या जाळ्यात पूर्ण देश अडकला आहे. वर्षानुवर्षे जनमाणसाला पारतंत्र्यात ठेवणारी धर्मांधवादी विषमता डोके वर काढू पाहते आहे. स्वार्थी राजकारणाने जाती पातीतील यादवी युद्ध स्तोम माजवण्याच्या तयारीत आहेत. विचारवंतांवर बंधने आली आहेत, अन्याया विरुद्ध आवाज उठवणाऱ्या यंत्रणा बंद पाडल्या आहेत. ह्या सर्व गोष्टी घडल्या आहेत फक्त आणि फक्त आपल्या मानसिक गाफिलपणामुळे.

ह्या देशाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा व्हावा ह्यासाठी स्वतः बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी त्यांच्या पारदर्शी विचारातून भविष्यातील उणे दुणे, आणि त्यावर योग्य नियोजन बद्ध उपाय आपल्या समोर कायदेशीर आणि तर्कपद्धतीने त्यांच्या लेखणीतून लिहून ठेवले आहे. पण जाणीवपूर्वक ह्या देशाला धर्माच्या व्यवस्थेच्या आधारावर निर्मित करण्यासाठी इथली सनद शीर शिस्त, कायदे, नियम बाह्य करून त्यात बेबंद शाही माजावण्याचं काम सध्या राष्ट्रीय पातळीवर चालू आहे. देशात धर्मांधवादी व्यवथेचा जय करून सत्ता फक्त अमुक उच्च वर्णी्यांच्या च हाती जावी आणि बाकीच्यांनी त्यांची गुलामी करावी हाच डाव सद्या स्थित लक्षात येतो.

ह्या सर्व गोष्टींचा मूळ पाहिल तर आपल्या जनतेच्या मनातील अंध श्रद्धेची भावना, जातीय विषमता, धर्मांध वादी वाटचाल, अज्ञान ह्या सर्व गोष्टी मानवी वैज्ञानिक दृष्टिकोन पूर्ण नाहीसा करतात आणि भविष्याच्या चिंतणावर, समस्यांवर वैचारिक शक्तीला पुरस्कृत न करता मारक ठरत आहेत. नवीन काहीतरी घडवण्याचा आपला विज्ञानवादी तर्क दृष्टिकोन ह्या सर्व निरर्थक गोष्टीने निकामी ठरत आहे.देशातील जनतेनी काय करावं कसं जगावं हे सुद्धा ह्या अज्ञान पणामुळे स्वार्थी राजकारणी आपल्या पद्धतीने ठरवत आहेत. जर इथले असंख्य मूलनिवासी जनलोकं जर ह्या देशाची मालक असेल त्याच्या श्रमाणे इथल्या शिवारात क्रांती येत असेल, त्याच्या घामाने देश जगत असेल आणि असं असतांना सुद्धा त्या श्रमाणे माखलेल्या मूलनिवासी राजाला जर मानसिक गुलामीने आपल्या जगण्याची व्यवस्था देशातल्या रक्तापिपासू, लुटारू वर्गाच्या हातात देण्याची वेळ येत असेल. आणि महापुरुषांच्या वैचारिक वारसाने संपन्न असलेल्या देशात जर मानसिक गुलामीच नांदणार असेल तर मी म्हणेन तुम्ही

कर्माने मरत तर आहातच,पण माणूस असून बुद्धी वादी मेंदू असतांना सुद्धा विचारांनी पण मारलेलेच!※

**– राजरत्न जाधव**

# नाशिक टेनिस क्रिकेट विभाग प्रमुखपदी निफाडच्या विलास गायकवाड यांची नियुक्ती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशन व सातारा जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक सहविचार सभा क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड सातारा येथे उत्साहात पार पडली. त्यामध्ये नाशिक टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड यांची नाशिक विभाग प्रमुखपदी निवड करण्यात आली. या सभेच्या अध्यक्ष म्हणून भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेट संघटनेच्या सचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र राज्य महिला डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशन उपाध्यक्ष विलास गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोशियन सहसचिव चंद्रकांत तोरणे, धनुभाऊ लोखंडे आदी उपस्थीत होते. गायकवाड यांची विभाग स्तरावर निवड झाल्याबद्दल. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात असुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहे.

# एमसीए प्रवेशासाठीची ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये एमसीए प्रवेशाकरिता आवश्यक असलेली ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया सोमवार, दि. ३० जून २०२५ पासून सुरु झाली असून ही प्रक्रिया गुरुवार, दि. ९ जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने एमसीए ची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सोमवार, दि. ३० जून २०२५ पासून ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरु झाली असून गुरुवार, दि. ०९ जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत ही प्रक्रिया




चालणार आहे तसेच प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व निश्चिती (कन्फर्मेशन) करण्यासाठी मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ पासून ते शुक्रवार, दि.१० जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्या विद्यार्थ्यांनी 'एमएएच-एमसीए सीईटी २०२५' ही परीक्षा दिलेली असावी. स्वेरीच्या एम.सी.ए. विभागाचे यंदाचे हे चौथे वर्ष आहे. गेल्या वर्षी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी नोकरीसाठी विविध पदांवर रुजू देखील झाले आहेत. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक

## स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

मार्गदर्शनाखाली तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध आहे. या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील (मोबा. नंबर- ९५९५९२११५४) व एम.सी.ए.चे विभागप्रमुख प्रा. मनसब शेख (मोबा. नंबर- ९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या काटेकोर नियोजनामुळे भीमा नदीत येणारा विसर्ग बंद

## चंद्रभागा नदीपात्रातील वाळवंट राहणार वारकरी व भाविकांसाठी उपलब्ध;

## यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात भाविकांना करता येणार होडीतून जलप्रवास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर, (उमाका) : उजनी धरणातून भीमा नदी पात्रात सोडण्यात येणारा विसर्ग शून्य करण्यात यावा आशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांना दिल्या होत्या. त्यानुसार जलसंपदा विभागाने तात्काळ कार्यवाही करून उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग शून्य केला आहे. मागील पंधरा दिवसापासून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पंढरपूर येथे भीमा नदी पात्रातील विसर्ग स्थिर करून वाळवंट रिकामे व्हावे यासाठी प्रयत्नशील होते, त्यांनी केलेल्या सक्षम व काटेकोर नियोजनामुळेच हे शक्य झालं.

उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग शून्य झाल्याने आज रात्री एक ते दोन च्या दरम्यान चंद्रभागा नदीपात्राची पाणी पातळी योग्य प्रमाणात राहणार आहे. चंद्रभागा नदीपात्राची पाणी पातळी कमी झाल्याबरोबर वाळवंट रिकामे होईल. त्यानंतर दिनांक ४ जुलै रोजी पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबवून वाळवंट स्वच्छ करण्यात येणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना रिकामे व स्वच्छ वाळवंट उपलब्ध होणार आहे. जेणेकरून भाविकांना वारकऱ्यांना आषाढी एकादशी निमित्त वाळवंटात त्यांचे नियमित कार्यक्रम करणे शक्य होणार आहे.

सध्या पुणे जिल्ह्यात सतत पाऊस पडत असल्याने नदी पात्रात आज सकाळी सात हजार पाचशे इतका विसर्ग सोडण्यात आला आहे तो विसर्ग चंद्रभागा नदी पात्रात पाच जुलै रोजी पहाटे पाच वाजता पोहोचणार आहे. उजनीचा विसर्ग पूर्णपणे बंद असल्याने चंद्रभागा पात्रातून ७२०० इतकाच प्रवाह राहील. त्यामुळे वारकरी, भाविकांना रिकामे व स्वच्छ वाळवंट वापरण्यास उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वारकरी व भावीक वाळवंटाचा वापर करू शकतात. त्यामुळे पंढरपूर शहरात इतर ठिकाणी भाविक, वारकऱ्यांचा अधिकचा ताण व गर्दी राहणार नाही. पाण्याचा प्रवाह पातळी कमी असल्याने पुंडलिक मंदिर पाण्याखाली जाणार नाही. व वारकरी, भाविकांना चंद्रभागा नदीपात्रात होडीतून जल प्रवास सेवाही उपलब्ध होऊ शकणार आहे.

दिनांक ३ जुलै रोजी रात्री एक पासून ते पाच जुलै २०२५ च्या पहाटे पाच पर्यंत भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग हा ५ हजार क्युसेक असेल तर ५ जुलै च्या पहाटे सहा वाजल्यापासून पूर्ण यात्रा कालावधीत भीमा नदी पात्रात ७ हजार २०० क्युसेक पाण्याचा प्रवाह राहील. त्यामुळे संपूर्ण यात्रा कालावधीत दगडी फुल व पुंडलिक मंदिर तसेच वाळवंट रिकामे होणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मागील पंधरा दिवसापासून उजनी धरणातील पाण्याविषयी केलेल्या काटेकोर नियोजनामुळे उजनी धरणात ही बफर स्टॉक निर्माण झालेला आहे. तसेच भीमा नदी पात्रातील पाण्याचा विसर्ग कमी करणे शक्य झालेले आहे.

# नळदुर्ग येथे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस.के.गायकवाड :- हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती नळदुर्ग येथे विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली .

नळदुर्ग येथील वसंतराव नाईक गोलाई चौकात नियोजित वसंतराव नाईक स्मारकाच्या ठिकाणी हरित क्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त बंजारा समाज बांधवांच्या वतीने अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून शांततेचे प्रतीक असलेल्या पांढऱ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी भाजपाचे युवा नेते मल्हार दादा पाटील यांनीही उपस्थित मान्यवरांच्या समवेत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केल.



तसेच येथील वसंतनगर येथे स्वर्गीय वसंतराव नाईक याच्या जयंतीचे औचित्य साधून वसंतराव नाईक जयंती उत्सव कमिटीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जि.प.सदस्य प्रकाश चव्हाण यांनी केले.तर भाजपाचे युवा नेते मल्हार दादा पाटील यांनी देखील रक्तदान शिबिरास भेटी देऊन कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले.यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण , जीपचे माजी सदस्य तथा भाजपाचे नेते दिपक आलूरे , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ड.आशिष सोनटक्के,भाजपाचे दत्ता राजमाने , तांडा समृद्धी योजनेचे अशासकीय सदस्य विलास राठोड, प्रविण पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे हरीष जाधव , आश्रम शाळेचे अध्यक्ष वैभव जाधव, कैलास चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण , वसंत पवार, शिवाजी चव्हाण , मोतीराम राठोड,एम.पी.राठोड , महेश चव्हाण,जयंती कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण चव्हाण,सचिव दत्ता राठोड,कार्याध्यक्ष सुरेश राठोड,कोषाध्यक्ष सचिन राठोड, मिरवणूक प्रमुख सुशील राठोड, रवि महाराज, माजी नगरसेविका छिमाबाई राठोड,भाजपाचे धिमाजी घुगे , साहेबराव घुगे ,पद्माकर घोडके,श्रमिक पोतदार,किशोर धुमाळ,पाडूरंग पुदाले ,रिपाइं(आठवले)चे एस. के.गायकवाड,गणेश राठोड , अमरजीत पवार, विष्णू जाधव सह बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# शिष्यवृत्ती आणि शासकीय योजनांची माहिती ग्रामसभेत देण्याची आवश्यकता : प्रा. सुवर्णा पगार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/ प्रतिनिधि : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने आयोजित ओबीसी पर्वातील तिसऱ्या विचारपुष्प मालेमध्ये प्राध्यापिका सुवर्णा पगार बोलत होत्या. महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीच्या योजना व महाज्योतीच्या संदर्भातील सर्व कार्यप्रणाली याबाबत नाशिक विभागीय कार्यालय प्रकल्प व्यवस्थापक प्राध्यापिका श्रीमती सुवर्णा पगार यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आजचे विचारपुष्प गुंफले,आपल्या मार्गदर्शनात त्यांनी ओबीसी प्रवर्गांमध्ये येणाऱ्या सर्व उपघटकांना महाज्योतीमार्फत सरकार कोणकोणत्या सोयी सवलती अथवा शिष्यवृत्ती देत आहे , त्यासाठी काय आणि कोणते निकष आहेत याबाबत सविस्तर माहिती दिली. डाऊट सेशन या सदरामध्ये सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांनी अनेक प्रकारचे प्रश्न विचारले असता एक बाब निदर्शनास आली की पालक वर्ग याबाबत अजूनही अनभिज्ञ आहे त्यामुळे पालक, समाज यांना या विषयाची माहिती व्हावी यासाठी सर्व शासकीय शिष्यवृत्ती, सर्व शासकीय योजना विद्यार्थी हितासाठी असलेल्या संस्था आणि त्यांचे कार्य याबाबत आपण आपल्या प्रत्येक गावामध्ये होणाऱ्या ग्रामसभेत याची माहिती दिली तर प्रत्येक पालकांपर्यंत या विषयाची जाणीव जागृती होईल अशा प्रकारची आशा प्राध्यापक सुवर्णा पगार यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या पहिल्या बैठकीमध्ये संघटना बांधणी सोबत संघटनेची आवश्यकता याबाबत चर्चा झाली. दुसऱ्या बैठकीमध्ये ओबीसी संघर्ष योद्धे मा.ॲड.मंगेश ससाने यांनी ओबीसी साठी असलेल्या शासकीय योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तिसऱ्या पुष्प मालेमध्ये आज प्राध्यापिका श्रीमती सुवर्णा पगार यांनी आपल्या ओबीसी बांधवांसाठी स्थापित केलेल्या महाज्योतीची इत्यंभूत माहिती दिली. त्यानंतर संघटनेच्या वतीने नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन ठराव घेण्यात आला. येणाऱ्या कालावधीत नॉन क्रिमीलेअरचा प्रश्न असो की पदोन्नती चा या सर्व विषयांच्याबाबत जाणीव जागृती व्हावी यासाठी पुढील पुष्प काही दिवसातच आयोजित करण्यात येणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांनी सांगितले.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी सुरेख असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल तर हिंगोली जिल्हा अध्यक्ष लहू राक्षे यांनी संघटनेच्या वतीने आभार मानले व आपली संघटना श्रमिक संघाकडे नोंदणीकृत असून माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील साहेब व माजी सदस्य राज्य मागासवर्गीय आयोग ॲड.बी.एल.सगर किल्लारीकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करते असे सांगितले. आयत्या वेळच्या विषयात ॲड.मंगेश ससाणे यांनी ही यथोचित मार्गदर्शन केले. राज्यप्रतिनिधी राजेंद्र खैरनार यांनी संघटना वाढीसाठी प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांनी विदर्भातील अमरावती आणि यवतमाळ तर मराठवाड्यातील नांदेड येथे जाऊन जिल्हा कार्यकारिणी गठित केल्याबद्दल अभिनंदन ठराव मांडला व उपस्थित सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिले.सभेला राज्य, विभाग तथा तालुक्यातील सर्व शाखांचे पदाधिकारी, प्राध्यापक , शिक्षक, मुख्याध्यापक, पालक उपस्थित होते..

# स्वेरीच्या वतीने वारीपुर्व स्वच्छता अभियान उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर- आषाढी वारी चार दिवसावर आली असून ही वारी यशस्वी होण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न केले जात आहेत. त्यालाच हातभार लावत स्वेरीने देखील आपली परंपरा पुढे चालू ठेवली असून आणि पंढरपूर प्रशासन आणि पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वेरी अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आज गोपाळपूर चौकात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

## 'स्वेरी'ने जपली सामाजिक बांधिलकी

उच्चतंत्र शिक्षण क्षेत्रात 'पंढरपूर पॅटर्न' मुळे राज्यात वेगळी ओळख निर्माण केलेल्या स्वेरीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांबरोबरच शहरी भागातील विद्यार्थ्यांना देखील प्रगतीच्या दिशेने नेत असताना सामाजिक बांधिलकीची नेहमीच जोपासना केली आहे. शिक्षणाबरोबरच विधायक व सामाजिक कार्यात देखील स्वेरी सातत्याने सहभाग नोंदवीत असते. वारीकाळात स्वेरीच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यामार्फत 'स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मलवारी, हरित वारी' अंतर्गत स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार यांच्या नेतृत्वाखाली ही स्वच्छता मोहीम राबविली गेली. सकाळी साडेसात वाजता गोपाळपूरच्या प्रथम नागरिक तथा सरपंच सौ.पुष्पा बनसोडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी गोपाळपुरातील मंदिर परिसर, गोपाळपूर चौक, विठ्ठल- रुक्मिणी दर्शन रांग आदी ठिकाणी वारीपुर्व स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य हातात घेवून स्वेरीचे विद्यार्थी प्राध्यापक वर्ग व स्वेरी संस्थेचे पदाधिकारी हे सर्वजण स्वच्छता करत होते. यावेळी गोपाळपूरचे दिलीप गुरव म्हणाले की, 'स्थापनेपासूनच स्वेरी नेहमी अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असते.' स्वेरीचे नूतन सचिव प्रा. सुरज रोंगे याप्रसंगी म्हणाले की, 'पंढरी नगरीत येणाऱ्या भाविकांची सेवा करण्याचे भाग्य आपल्या सर्वांना लागते त्यामुळे आपण भाग्यवान आहोत तसेच गोपाळपूर ग्रामपंचायत आणि येथील नागरिकांनी स्वेरीला सुरूवातीपासूनच सहकार्य केले आहे.' या स्वच्छता अभियानाच्या उदघाटन प्रसंगी गोपाळपूरचे सरपंच प्रतिनिधी राजेंद्र बनसोडे, उपसरपंच बापूसाहेब लेंगरे, बापूसाहेब पडवळे, दिलीप गुरव, राहुल माने, समाजसेवक विक्रम आसबे, उदयसिंह पवार, ग्रामस्थ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे आदी यावेळी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, अभियांत्रिकीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. डी.एस. चौधरी, प्रा.अमोल चौंडे, फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.एच.बी.बनसोडे इतर प्राध्यापक व 'राष्ट्रीय सेवा योजने'तील सुमारे ३०० विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ही स्वच्छता मोहीम राबविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

**डॉक्टर, सीए व शेतकरी बांधवांचा स्नेहमेळावा**

**आमदार प्रशांत परिचारक**

# डॉक्टर, सीए, शेतकरी बांधव हे देशाच्या आर्थिक विकासाचे आधारस्तंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दि पंढरपूर अर्बन को ऑप बँक लि. पंढरपूर आयोजित डॉक्टर , सी ए व शेतकरी बांधव यांचा स्नेहमेळावा पंढरपूर अर्बन बँकेच्या कर्मयोगी सभागृह येथे नुकताच संपन्न झाला . कार्यक्रमाचेप्रसंगी श्री. पांडुरंग व धन्वंतरीमातेच्या प्रतिमेचे पूजन आमदार प्रशांत परिचारक, आय एम ए च्या अध्यक्षा डॉ. सौ ऋतुजा उत्पात, निमाचे अध्यक्ष डॉ. अमरसिंह जमदाडे, डॉ. श्री दत्ता साळुंखे ,होमिओपेथीक असोशिएशसन चे अध्यक्ष डॉ. अनिल आसबे, फ़िजिओ थेरपी संघटनेचे अध्यक्ष डॉ. आशिष चव्हाण, डॉ. महेश देशपांडे, डॉ. बजरंग धोत्रे, सीए शिरीष कोठाडीया, बँकेचे चेअरमन श्री सतीश मुळे, व्हा चेअरमन सौ माधुरी जोशी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री उमेश विरधे, संचालिका डॉ. संगीता पाटील यांचे उपस्थितीमध्ये संपन्न झाले .




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री उमेश विरधे म्हणाले की, डॉक्टर्स हे जीवनाच्या लढाईमधील खरे योध्ये आहेत ऊन, वारा, पाऊस या तिन्ही ऋतूत ते सेवेसाठी तत्पर असतात. ज्ञानाच्या व सेवाभावी वृत्तीच्या जोरावर माणसातील आशा व आत्मविश्वास टिकवून ठेवतात .सी ए हे एखाद्या संस्थेच्या आर्थिक आरोग्याचे वैद्य असतात. शेतकरी हा जगाचा पोशिंदा मानला जातो. निसर्गातील चढ उतारांचा नेटाने सामना करीत कष्टाने शिवार फुलवतात , या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने हा स्नेह मेळावा आयोजित केला आहे. याप्रसंगी बँकेच्या विविध योजनाची माहिती याद्वारे देण्यात आली.

बँकेचे चेअरमन श्री सतीश मुळे म्हणाले की डॉक्टर्स , सी ए , शेतकरी यांना जगात अनन्यसाधारण महत्व आहे , आपल्या कार्यकुशल्तेच्या जोरावर आपल्या व्यवसायात स्वताला समर्पण भावनेने सेवा देतात.आपल्यासमोर आरोग्याचे संकट उभा राहिलेवर डॉक्टर देवदूतासारखे धावून येतात, आपल्या तल्लख बुद्धीने , निष्ठेने व प्रामाणिकपणे देशाच्या आर्थिक घडामोडींना दिशा देणारे सीए असतात, तर शेतकरी हे देशाच्या उन्नतीचे पाया आहेत या सर्वांमुळे आपण सुखाची झोप घेऊ शकत आहे. अशा लोकांना सेवा देण्यास आम्हाला आनंद होईल.

याप्रसंगी बँकेचे कुटुंबप्रमुख श्री प्रशांत परिचारक यांनी डॉक्टर, सीए, शेतकरी त्यांना शुभेच्छा देत म्हणाले, हे सर्वजण तिन्ही क्षेत्रांमध्ये देशाच्या आर्थिक विकासाचे आधारस्तंभ आहेत. आर्थिक जगतातील शिस्त, पारदर्शकता आणि सचोटी यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सीए आहेत. सीए डे हा व्यावायिक पदाचा सन्मान नाही तर पारदर्शकता, प्रामाणिकपणा, बुद्धीमत्तेचा गौरव आहे. आजच्या ताण तणावाने भरलेल्या जीवनात डॉक्टरांचे स्थान केवळ रूग्णालयापुरते मर्यादित नाही तर मानसिक भावनिक आणि सामाजिक आरोग्याचे मार्गदर्शक ठरतात, त्यांची सेवा , समर्पण आणि संवेदनशीलता यामुळे जीवनातील खरे हिरो ठरतात्त. शेतकरी म्हणजे जमीन आणि आभाळ यांच्यामध्ये स्वताच आयुष्य गवसलेला एक परिश्रमी योद्धा आहे ,त्यांच्या अविश्रांत कष्टाच्या जोरावर आपण आपली भूक भागवू शकतो. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हेतूने या स्नेह मेळाव्याचे आयोजन केले आहे . बँकेला ११३ वर्षाची विश्वसनीय परंपरा असून स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक मोठे मालक यांच्या आशीर्वादाने, आपल्या सर्वांच्या सहयोगामुळे बँक यशस्वी वाटचाल करीत आहे. कार्याक्रमचे स्वागत सौ माधुरीताई जोशी यांनी केले . या प्रसंगी आय एम ए च्या अध्यक्षा डॉ. सौ. ऋतुजा उत्पात, सीए शिरीष कोठाडीया, सी ए पवनकुमार झंवर यांनी मनोगत व्यक्त केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे व्यवस्थापक श्री गणेश हरिदास, निरंजन रुपलग, संदीप पिटके व पंढरपूर बँक कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले . याप्रसंगी शहरातील बहुसंख्य डॉक्टर, सीए, बँकेचे संचालक श्री शांताराम कुलकर्णी , अनिल अभंगराव , विनायक हरिदास , अनंत कटप, प्रभूलिंग भिंगे, गणेश सिंघण, गजेंद्र माने , हरीश ताठे , व्यंकटेश कौलवार, सी ए अतुल कौलवार उपस्थित होते .

## थोडक्यात...

### चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण ; सहा जणांवर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) पत्नी सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी किरकोळ कारणावरून संसार उपयोगी साहित्यावरून व तसेच शारीरिक व मानसिक त्रास देऊन तिच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण केली.तसेच घर बांधण्यासाठी एक लाखाची मागणी करून छळ केल्याची फिर्याद स्वाती धनंजय भोसले (वय-२४-,रा.जोशी गल्ली,रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे. फिर्यादीवरून पती धनंजय,सासू मीनाक्षी,सासरे बळवंत,जाऊ काजल नणंद मनीषा व नंदवा विनोद (सर्व.रा.सांगली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मस्के हे करीत आहेत.

### अपघातात जखमी ; अज्ञात दुचाकी स्वारावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) दुचाकीच्या धडकेत एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना २६ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आसरा चौक येथे घडली.याप्रकरणी समीर आजमोद्दीन नदाफ (वय-२६,रा.मु.पोस्ट मद्रे,ता. दक्षिण सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी स्वारावरविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक एमएच.१३. ईजी.७४०३ यावरून आसरा चौक येथून होटगी रोडने गावाकडे जात असताना भारत माता नगर होडगी रोड सोलापूर येथे अज्ञात दुचाकी स्वाराने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक १३.इजी.६१२५ ही दुचाकी विरुद्ध दिशेने चालवून फिर्यादीच्या समोर धडक देऊन गंभीर जखमी करण्यास व तसेच स्वतः गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिंदे हे करीत आहेत.

### शासकीय कामकाजात अडथळा ; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही घटना ३० जून रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास माध्यमिक शिक्षण विभाग दुसरा मजला जिल्हा परिषदेत घडली. याप्रकरणी विठ्ठल दिगंबर ढेपे (वय-४९,रा.खंडोबा मंदिर समोर,बाळे) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मल्लिकार्जुन पाटील (रा.जेऊर,ता.अक्कलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील ठिकाणी मल्लिकार्जुन पाटील याने सचिन नागनाथ जगताप शिक्षणाधिकारी सोलापूर यांना माध्यमिक शिक्षण विभागातील कुठलेही शासकीय कामकाज करू दिले नाही व शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला आहे. अशा आशयाची फिर्याद विठ्ठल ढेपे यांनी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मल्लिकार्जुन पाटील यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आषाढी वारीसाठी प्रशासनाने केलेल्या सुविधांची पाहणी

## उपमुख्यमंत्र्यांच्या सूचना; केलेल्या नियोजनाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (उमाका) : आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने पंढरपूर शहर, मंदिर परिसर, दर्शन रांग (पत्रा शेड), भक्ती सागर(६५ एकर) या ठिकाणी वारकरी, भावीकांसाठी प्रशासनाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. व या कालावधीत सर्व पालखी सोहळ्या समवेत येणारे वारकरी, भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याबाबत केलेल्या नियोजनाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.



यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, मंदिर समितीचे कार्य अधिकारी राजेंद्र शेळके, प्रांताधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी महेश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भक्ती सागर (६५ एकर) येथे प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांची पाहणी करण्यासाठी बुलेट वरून आले. येथील आपत्कालीन दक्षता व प्रतिसाद केंद्राला भेट देऊन तेथे आयसीयू मध्ये असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच आरोग्य सेवा व्यवस्थित मिळत आहे का याचीही त्यांनी खात्री केली. पोलीस विभागाने वारी कालावधीत ड्रोनद्वारे गर्दी व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नव्याने खरेदी केलेल्या ड्रोनची पाहणी करून उद्घाटनही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा व्यवस्थाची ही पाहणी त्यांनी केली.

त्यानंतर वाळवंटात प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सुविधांची पाहणी केली व उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा पाण्याचा प्रवाह नियंत्रित ठेवून वाळवंट वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध राहील, याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी सुचित केले. तसेच नदीपात्रात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या अनुषंगाने काळजी घेण्याबाबत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी निर्देशित केले. तसेच पत्राशेड येथे असलेल्या दर्शन रांगेची पाहणी ही त्यांनी केली. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून दर्शन रांगेत उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा विषयी माहिती, त्यांनी घेतली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारी २०२५ मध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी मार्ग, पंढरपूर शहर, भक्ती सागर, पत्रा शेड, वाखरी तळ येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची सविस्तर माहिती दिली. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संपूर्ण यात्रा कालावधीत पोलीस प्रशासनाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

# हवामान अनुकूल शेती करावी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/ प्रतिनिधि भरघोस व चांगल्या पिक , उत्पादनासाठी जमीन ,पाणी हवा हे घटक महत्त्वाचे असून शेतकऱ्यांनी हवामानाचा अभ्यास करून अनुकूल हवामानात येणारी पिके घ्यावीत याचबरोबर शेतकऱ्यांनी फळपीक घेणे गरजेचे आहे ज्या शेतकऱ्यांनी फळबाग शेती केली आहे त्यांची शेती फायदेशीर ठरली आहे असे विचार कळंब तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी कृषी दिन कार्यक्रमात बोलत असताना व्यक्त केले.

**तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे**

१ जुलै महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषी दिन म्हणून साजरा केला जातो या कार्यक्रमाच्या मंचावर किरण निंबाळकर कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती कळंब, वैभव तांबारे कृषी मंडल अधिकारी, ए. एन .काळे कृषी सहाय्यक, एकनाथ झाहीर ऑक्सर सिड प्रतिनिधी धाराशिव- बीड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात पुढे बोलताना तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी सेंद्रिय खताच्या वापरामुळे जमीन सुपीक बनते व तिचे आरोग्य चांगले राहते असे सांगितले व जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांच्या संकल्पनेतून धाराशिव जिल्ह्यात ग्रीन धाराशिव वृक्षारोपणाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प राबविण्यात असून यासाठी खुली,संस्था, कार्यालयाच्या पडीक व खुल्या जागेत २०२५ पावसाळ्यात ५० लाख झाडे व एकाच दिवशी १५ लाख झाडे लावण्यात येणार असल्याचे सांगून या कार्यक्रमात सहभागी होण्याचे तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी आवाहन केले या कार्यक्रमात वैभव तांबारे, मंडल कृषी अधिकारी यांनी आपले विचार व्यक्त केले तसेच एकनाथ जाहीर ऑस्कर सिड प्रतिनिधी यांनी शेतीमध्ये जैविक, सेंद्रिय खते ,गांडूळ खत वापरावे यामुळे उत्पादन वाढते तसेच रसायनिक खताच्या वापरामुळे व याच्या परिणामामुळे माणसाच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असून वेगवेगळे आजार वाढत आहेत यापासून मुक्ती मिळवण्यासाठी ,तंदुरुस्त राहण्यासाठी सेंद्रिय शेती विषयी सखोल मार्गदर्शन केले कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै, वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमात कळंब तालुका कृषी कार्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांना विविध योजना विषयी प्रोजेक्टर द्वारे माहिती दिली या प्रसंगी कळंब तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक नंदकुमार कदम, श्रीमती एम.के. फाटक, ऑपरेटर प्रसाद काळे यांची उपस्थिती होती.

# संवेदनशील मुख्यमंत्र्यांनी वागदरीच्या रुग्णाला दिली दुसऱ्यांदा मदतनिधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी( ता-अक्कलकोट) येथील श्री समर्थ विठ्ठल आवताडे या रुग्णाच्या मेंदूवर गेल्या महिन्यात मार्कंडेय रुग्णालय सोलापूर येथे मोठी शस्त्रक्रिया पार पडली.उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळावी म्हणून आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्याकडे मागणी केली असता ,मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची मदत लगेचच संबंधित रुग्णाला मिळाली.



**आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मागणीला आले यश**

त्याच रुग्णावर गेल्या आठवड्यात पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली. संबंधित रुग्णाची आर्थिक अडचण लक्षात घेऊन आमदार श्री सचिनदादांनी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांच्याकडे मदतनिधी देण्याविषयी पत्राद्वारे मागणी केली.त्यावर आदरणीय मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून ७५००० रुपयांची मदतनिधी त्या रुग्णास पुन्हा दिली.आत्तापर्यंत सदर रुग्णास एकूण १,७५,००० रु इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यात आले.ऐन गरजेच्या वेळी मदतनिधी मिळाल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकाकडून मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी ,मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांचे विशेष आभार मानण्यात आले.

### नामा ॲग्री इनपुट मनुफॅक्चरर्स ऑफ इंडिया कंपनीच्या वतीने

# जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना अन्नदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

नामा ॲग्री इनपुट मनुफॅक्चरर्स ऑफ इंडिया कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांनी संत तुकाराम महाराज यांची सेवा गेली चार वर्षापासून कार्यरत आहे

हे असोशियन कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या विविध कंपन्या आणि विविध विक्रेत्या यांचे एक विशाल संघटन आहे हे संपूर्ण महाराष्ट्र व इतर राज्यात हे काम करते या सोबतच सामाजिक सलोखा संभाळत विविध सामाजिक कार्यात देखील सक्रिय असते जगतगुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारी मधील सर्व माऊलींची सेवा वारकऱ्यांना जीवन आवश्यक वस्तूंचे वाटप व फराळाचे वाटप इत्यादी विविध उपक्रम व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम ही संघटना करते मागील चार वर्षापासून सतत कार्यरत आहे यावेळी उपस्थित संस्थेचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष दिलीप घोडके, सचिव नितीन आटोळे,डायरेक्टर रामदास चव्हाण ,सागर पार्लेकर, दादासाहेब करे ,कुमार काकडे, नवनाथ हगारे ,शेलार साहेब, विजय कदम ,डी.व्ही शिंदे, किशोर गर्जे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

### तांत्रिक नवकल्पना, संशोधन, विकास व रोजगार निर्मितीला चालना मिळणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानाधारित उद्योगांच्या १ लाख ३५ हजार ३७१ कोटी रुपये गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आज उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीने राज्यातील थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांच्या एक लाख ३५ हजार ३७१ कोटी ५८ लाख (१,३५,३७१.५८ कोटी) रुपयांच्या प्रस्तावांना मान्यता दिली. यामुळे राज्यात सुमारे १ लाख प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन, विकास व रोजगार निर्मितीला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उद्योग विभागातंर्गत विशाल व अतिविशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत व थ्रस्ट सेक्टरच्या धोरणांतर्गत प्रोत्साहने मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची १२ वी बैठक आज विधानभवनातील मंत्रिमंडळ समिती सभागृहात झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव ए शैला, उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, आदी उपस्थित होते.




बैठकीमध्ये एकूण १९ मोठे, विशाल व अतिविशाल प्रकल्पांना प्रकल्पातील गुंतवणूक व रोजगारनिर्मिती विचारात घेऊन त्यांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. त्यापैकी १७ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पांमध्ये सेमीकंडक्टर, सिलीकॉन, इग्नॉट आणि वेफर्स, सेल आणि मॉडयुल, इलेक्ट्रीक वाहनांची साहित्यनिर्मिती, लिथियम आर्यन बॅटरी, अवकाश व संरक्षण साहित्य निर्मिती, वस्त्रोद्योग, हरित स्टील प्रकल्प, ग्रीन फिल्ड गॅस टू केमिकल इ. उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा समावेश आहे. या १७ प्रकल्पांमधून रूपये १,३५,३७१.५८ कोटी एवढी नवीन गुंतवणुक राज्यात येत असून, त्याद्वारे राज्यात आगामी कालावधीत अंदाजे एकूण १ लाख एवढी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.

यामध्ये उद्योगांना भांडवली अनुदान, वीज दर सवलत, व्याजदर सवलत, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, स्वामित्व धन परतावा, राज्य कर्मचारी भविष्य निर्वाह निधी परताव्यामध्ये सवलत, कर्मचारी प्रॉव्हिडंट फंड परतावा आदी सवलती देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

याशिवाय थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांची संख्या २२ वरून ३० पर्यंत वाढविणे, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील दापचरी व वंकास येथील जमीन संपादन करून वाटप करणे, तसेच ‘कोल गॅसिफिकेशन आणि डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटीज’ या उत्पादनाचा समावेश दि.२२.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये करून त्यांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यास मान्यता देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

आज मंजुरी दिलेल्या प्रस्तावांमध्ये नवी मुंबईतील पारस डिफेन्स अँड स्पेस टेक्नॉलॉजी, नागपूरमधील ज्युपिटर रिन्यूएबल प्रा.लि., रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, मे. बीएसएल सोलार प्रा.लि, मे. श्रेम बायो फ्यूएल .लि., पुण्यातील ह्युंदाई मोटार इंडिया, युनो मिंडा अँटो इनोव्हेशन प्रा.लि, एअर लिक्विड इंडिया होल्डिंग प्रा. लिं., रायगडमधील एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रोडक्शन लि., बालासोर अलॉयज लि, गडचिरोलीतील सुरजागड इस्पात प्रा.लि., सुफलाम इंडस्ट्रीज लि, सुफलाम मेटल प्रा.लि. किर्तीसागर मेटालॉय प्रा.लि., नंदूरबारमधील मे. जनरल पॉलिफिल्मस प्रा.लि, छत्रपती संभाजी नगरमधील एनपीएसपीएल अडव्हान्सड मटेरियल्स प्रा.लि, गोंदियातील सुफलाम इंडस्ट्रिज लि., साताऱ्यातील मे. वर्धन अँग्रो प्रोसेसिंग लि, सोलापूरमधील मे. आवताडे स्पिनर्स प्रा. लि या कंपन्यांचा समावेश आहे.

या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होऊन सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना त्याचा फायदा होणार आहे. राज्यात या प्रकल्पामुळे सेमी कंडक्टर, स्टील प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व रोजगार उपलब्ध होणार आहे. त्याचा फायदा स्थानिक अर्थव्यवस्था व एकत्रितपणे राज्याच्या विकासाला होऊन तांत्रिक नवकल्पना संशोधन आणि विकासाला चालना मिळेल. तसेच रोजगार क्षमता व उद्योन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होईल.